# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 07 April 2026
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक ०७ एप्रिल २०२६ दुपारी १.०० वा.

****

बुलढाणा जिल्ह्यातल्या जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या काठावर आज योग महोत्सवाचं उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झालं. आंतरराष्ट्रीय योग दिनाला ७५ दिवस शिल्लक असताना योगाचा प्रचार–प्रसार व्हावा या दृष्टिकोनातून या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. मानवी शरीरासाठी योग हा केवळ शारीरिक व्यायाम नाही, तर एक समग्र जीवनशैली आहे, आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण जीवनशैलीत योगाचं महत्त्व अधिकच वाढलं असल्याचं जाधव यांनी यावेळी नमूद केलं. यावेळी एकाच वेळी सहा हजार जणांनी त्रिकोणासन केलं, याची एशियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झाल्याची घोषणाही यावेळी करण्यात आली. याबद्दलचं प्रमाणपत्र जाधव यांना सुपुर्द करण्यात आलं. मोठ्या संख्येनं नागरीक यावेळी उपस्थित होते.

****

राज्यांमधल्या स्थलांतरित कामगारांना वितरीत केल्या जाणा–या पाच किलोच्या एलपीजी सिलेंडर्सचं दैनिक वाटप दुप्पट करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचीव डॉ. नीरज मित्तल यांनी सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना यासंदर्भात पत्र लिहिलं आहे. हे सिलेंडर्स प्रत्येक राज्य सरकारला तेल विपणन कंपन्यांच्या सहकार्यानं पुरवली जाणार असून, सिलेंडर्सच्या संख्येतली ही वाढ, अशा कामगारांना आतापर्यंत पुरवलेल्या सिलेंडर्सच्या दैनिक सरासरी संख्येवर आधारित असेल.

****

जागतिक आरोग्य दिन आज पाळला जात आहे. यानिमित्त सामाजिक माध्यमावरच्या संदेशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, समाजाच्या सेवेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली, तसंच अधिक निरोगी आणि सुदृढ समाज घडवण्याच्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार केला. आपण सर्वजण मिळून आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाला प्राधान्य देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करूया, असं आवाहनही पंतप्रधानांनी केलं.

**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी.नड्डा यांनी जागतिक आरोग्य दिनानिमित्त सर्व डॉक्टर्स, नर्सेस आणि आघाडीच्या फळीतल्या कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत. या सर्वांच्या समर्पणामुळेच देशाची आरोग्य व्यवस्था मजबूत झाली असल्याचं, त्यांनी आपल्या याबाबतच्या संदेशात म्हटलं आहे. आयुष्मान भारत आणि प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी योजना, यासारख्या परिवर्तनकारक योजनांमुळे आरोग्य यंत्रणा बळकट झाल्याचं नड्डा यांनी म्हटलं आहे.

****

शिख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुरजी यांच्या प्रकाश पर्वाच्या औचित्यानं उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. गुरु तेग बहादुरजी यांचं जीवन साहस, त्याग आणि सत्य, मानवी प्रतिष्ठा आणि आस्था स्वातंत्र्यासाठीची कटिबद्धता दर्शवत असल्याचं, उपराष्ट्रपतींनी आपल्या याबाबतच्या संदेशात म्हटलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही गुरु तेग बहादुरजी यांना आदरांजली वाहिली आहे. गुरु तेग बहादुरजी हे एक महान आध्यात्मिक व्यक्तिमत्व होतं असं त्यांनी म्हटलं आहे. त्यांचा शाश्वत संदेश एक न्यायपूर्ण, करुणामय आणि समंजस समाज निर्माण करण्यात लोकांना मार्गदर्शन करत राहील, असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनीही प्रकाश पर्वानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु तेग बहादूर यांनी भारतीय संस्कृती आणि मानवतेच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान दिलं, क्रूर शासकांच्या अन्याय आणि अत्याचाराविरोधात ठामपणे उभं राहून त्यांनी, करुणा आणि सहानुभूतीचं उदाहरण दिल्याचं, शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड फाऊंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोगाच्या उपचारासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पासाठी बीपीसीएल फाऊंडेशनकडून सामाजिक दायित्वमध्ये विशेष निधी देण्यात येणार आहे. या सामंजस्य करारामुळे बालकांच्या कर्करोग उपचारांमधले आर्थिक अडथळे कमी होणार असून, सर्वसामान्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण उपचार पोहोचणार आहेत. महाराष्ट्रात आरोग्यसेवांचा दर्जा उंचावत आहे. कर्करोगाशी झुंज देणाऱ्या बालकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी या करारामुळे मोठी मदत होत असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.

****

नाशिक जिल्ह्यातल्या दिंडोरी इथं या महिन्याच्या तीन तारखेला विहिरीत कार कोसळून झालेल्या अपघाताची चौकशी करण्यासाठी नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी एक समिती नियुक्त केली असून, सात दिवसात अहवाल मागवला आहे.

****